# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## (पोलीस वार्तापत्र)

### सायंकाळ

---

### दिनांक 16.05.2019 गुरूवार

### (गुन्हे)

**1) पो.स्टे. हुडकेश्वर – घरफोडी :**

दिनांक 15.05.2019 चे 2045 वा ते 16.05.2019 चे 0815 वा दरम्यान पो.स्टे. हुडकेश्वर हद्दीत प्लॉट नं. 23, अयोध्या नगर, श्रीराम वाडी जवळ, नागपूर येथे राहणारे अतुल वसंतराव तिवसकर, वय 38 वर्ष, यांनी आपल्या घराला कुलूप लावून परिवारासह रिशेप्सनला गेले असता वेळ झाल्याने नातेवाईकांकडे मुक्काम केला असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून सोन्याचांदीचे दागीने व नगदी 3,000 रू असा एकुण 1,22,000 रू चा मुद्येमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. हुडकेश्वर येथे सपोउपनि राऊत, 9922432291 यांनी आरोपीविरूध्द कलम 454,457,380 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**2) पो.स्टे. पाचपावली – जबरी संभोग :**

दिनांक 14.05.2019 चे 1500 वा ते 15.05.2019 चे 1300 वा तसेच मागील 6 महीण्यापुर्वी पासून पो.स्टे. पाचपावली हद्यीत राहणा–या फिर्यादीची 13 वर्षीय अल्पवयीन पिडीत मुलगी ही घरी एकटी असतांना 36 वर्षीय आरोपी वडील याने फिर्यादीचे मुलीसोबत लैगीक अत्याचार करून तिची लैगीक छळवणुक केली. तसेच कोणाला काही सांगीतल्यास आरोपीने पिडीत मुलीस व फिर्यादीस जिवानीशी ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. पाचपावली येथे मपोउपनि राऊत, 8055217128 यांनी आरोपीविरूध्द कलम 376(एफ)(आय)(के),506(बी) भादंवि सहकलम 4,8,12 पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवून आरोपीस अटक केली आहे.

**3) पो.स्टे. बेलतरोडी – पळवून नेणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

दिनांक 15.05.2019 चे 0415 वा पुर्वी पो.स्टे. बेलतरोडी हद्दीत राहणा–या फिर्यादीची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी ही राहते घरून निघून गेली. शोध घेतला असता मिळून आली नाही. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार पो.स्टे. बेलतरोडी येथे पोहवा क्रिष्णा, 9373677442 यांनी कलम 363 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**4) पो.स्टे. नंदनवन – जिवानीशी ठार मारणा–या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल :**

पो.स्टे. नंदनवन हद्दीत जिजामाता नगर, गल्ली नं. 2, टॉवर लाईन जवळ, नागपूर येथे राहणारा फिर्यादी अर्जन राजकुमार मेहरा, वय 19 वर्ष, यांचे शेजारी आरोपी क्र. 1) शामा उर्फ शामराव सखाराम गडरिया, वय 48 वर्ष, व त्याचा 13 वर्षीय विधीसंघर्षग्रस्त मुलगा राहत असून फिर्यादी व त्याचे घरच्या लोकांनी वॉलकंपाउंडला टिनाचे कंपाउंड टाकत असतांना आरोपीने वाद घालून भांडण केले होते. सदर भांडणाबाबत फिर्यादीने आरोपी विरूध्द पो.स्टे. ला तक्रार दाखल करून घरी परत गेले असता दिनांक 11.05.2019 चे 2230 वा चे सुमारास आरोपीताने विधीसंघर्षग्रस्त बालकासोबत संगणमत करून तुने माझेविरूध्द रिपोर्ट दिली मी तुम्हाला सोडणार नाही असे म्हणून स्वताजवळील लाकडी दांडयाने फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ करन राजकुमार मेहरा, वय 21 वर्ष, याचे डोक्यावर व हातावर मारून गंभीर जखमी केले. जखमीला उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल ट्रामा सेंटर येथे भरती केले असता करन यास उपचारादरम्यान दिनांक 15.05.2019 चे 2015 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. नंदनवन येथे सपोनि तायडे, 8805011161 यांनी

आरोपीविरूध्द कलम 325,302,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदवून आरोपी क्र. 1 यास अटक करून विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

(अकस्मात मृत्यु)

1) पो.स्टे. धंतोली, अंबाझरी, हुडकेश्वर :

1) धंतोली – दिनांक 16.05.2019 चे 0720 वा पुर्वी अंदाजे 60 ते 65 वर्ष वयोगटातील एक अनोळखी इसम हा पो.स्टे. धंतोली हद्यीत आनंद टॉकीजच्या पहील्या माळयावर, नागपूर येथे मृत अवस्थेत मिळून आला. याप्रकरणी फिर्यादी अतुल राजु मेश्राम, वय 27 वर्ष, रा. आनंद नगर, सिताबर्डी, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. सिताबर्डी येथे पोउपनि राठोड, 8087806810 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

2) अंबाझरी – दिनांक 16.05.2019 चे 0735 वा पुर्वी कृष्णा गोविंदराव राऊत, वय 63 वर्ष, रा. आझाद नगर, राजपाल किराणा दुकानाजवळ, गिट्टीखदान, नागपूर यांचे प्रेत पो.स्टे. अंबाझरी हद्यीत फुटाळा तलावाचे पाण्यात तरंगतांना मिळून आले. याप्रकरणी फिर्यादी सौ. सिमा अविनाश पवार, वय 38 वर्ष, रा. महादेव एक्स.जी 506, यमुना पार्क समोर, अहमदाबाद, गुजरात यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. अंबाझरी येथे मपोउपनि शेख, 9623261100 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

3) हुडकेश्वर – दिनांक 15.05.2019 चे 2145 वा चे सुमारास पो.स्टे. हुडकेश्वर हद्यीत चक्रपाणी नगर, नरेश राऊतचे घरी किरायाने, नागपूर येथे राहणारी कु. नेहा रवि माहुले, वय 18 महीने ही घरासमोर उभी असतांना हीचे अंगावर लोखंडी स्लायडींग गेट पडल्याने ती गंभीर जखमी झाली. तिला उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल ट्रामा सेंटर येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 16.05.2019 चे 1215 वा चे सुमारास डॉक्टरांन तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. हुडकेश्वर येथे सपोउपनि राऊत 9922432291 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

(ईतर)

1) पो.स्टे. सिताबर्डी पोलीसांची कामगीरी –

दिनांक 13/05/019 चे 12.00 वा चे सुमारास आरोपी अहमद खान मोहम्मद बक्श खान वय 54 वर्षे, रा. प्लॉट नं. 39, शनि मंदिर मागे, जुनि कामठी रोड, कळमना वस्ती, नागपूर हा फिर्यादी प्रेमनाथ विठठ्लराव सिरसकर, यांचे दुकानात पो.स्टे. सिताबर्डी हद्यीत प्रेम बुट हाउस, मेनरोड, नागपूर येथे चप्पल खरेदि करिता आला. तेथे त्याने फिर्यादिस स्वतःचे नाव राशीद खान रा. कामठी असे सांगुन जिल्हा कचेरी येथे नोकरी करत असल्याचे सांगीतले तसेच फिर्यादीचे मुलाला ट्रेजरी ऑफीस मध्ये चपराशी किंवा क्लर्कची नोकरी लावुन देतो त्याकरिता 24,760/रू लागतील असे आमीश दाखवुन फिर्यादिचा विश्वास संपादन केला. त्याच्या भुलथापांना बळी पडुन फिर्यादी त्याचे मुलाचे कागदपत्र घेवुन आरोपीसह ट्रेजरी ऑफीस मध्ये गेले असता तेथे आरोपीने फिर्यादीस 24,760/रू भरावे लागतील असे सांगन फिर्यादी कडुण 25,000/रोख रक्कम घेतले व सदर रक्कम भरून त्याची पावती आणतो असे सांगुन फिर्यादीचे नकळत सदर रक्कम विश्वासघाताने घेवुन गेला अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. सिताबर्डी येथे कलम 406,420 भा.द.वि. गुन्हा नोंद करण्यात आला होता.

दिनांक 14/05/2019 रोजी गुप्त माहीती मिळाली कि यातील आरोपी हा जुनी कामठी रोड, कळमना वस्ती, नागपूर येथे राहतो व तो अशाच प्रकारे लोकाना नोकरीचे आमीष देवुन फसवणुक करतो त्यावरून त्याचा शोध घेवुन त्यास नमुद गुन्हयाबाबत विचारपुस केली असता त्याने नमुद गुन्हा कबुल केला व तसेच त्याने अशाच प्रकारे विविध लोकांची नोकरी लावुन देतो सांगुन फसवणुक केली असल्याचे तपासात उघड झाले आहे. त्यावरून पुढील तपास सुरू आहे.

अशा प्रकारची कोनाची फसवणुक झाली असल्यास त्यांनी पो.स्टे. सिताबर्डी नागपूर येथे संपर्क करावा. 9423580980, 9860410276

सदरची कारवाई ही मा. पो.उप.आयुक्त चिन्मय पंडीत, परि.क्र. 02, मा. सहा. पो. आयुक्त आर.बोरावके, सिताबर्डी विभाग, व.पो.नि. जग्वेंद्रसिंह राजपुत, पो.स्टे.सिताबर्डी यांचे मार्गदर्षनात पो.उप. निरि. ए.पी.राउत, ना.पो.शि प्रफुल मानकर, युवराज मोते, पो.शि पंकज निकम, गणेश जोगेकर, विक्रम सिंग यांनी पार पाडली.



<u>2) पो.स्टे. सिताबर्डी पोलीसांची कामगीरी –</u>

पोस्टे सिताबर्डी हद्दीत तसेच नागपुर शहरात वाहन चोरीचे गुन्हे तसेच रस्त्यावरुन मोबाईल हिसकावुन चोरुन नेण्याचे गंभीर स्वरूपाच्या गुन्हयांच्या प्रमाणात वाढ झाल्याने पोस्टे सिताबर्डी हद्दीत वरिष्ठ पोलीस निरिक्षक वपोनि जग्वेन्द्रसिंग राजपुत, यांचे मार्गदर्षनात सपोनि पी.एम.काळे, पोहवा जयपाल, नापोशि, चंद्रशेखर, प्रशांत, पोशि पंकज, पंकज, चंद्रशेखर यांनी चोरीच्या गुन्हयाची ठिकाणे निश्चित करुन त्याप्रमाणे अहोरात्र सापळा रचुन आरोपीतांचा शोध घेण्यात येत होता. तसेच सी.सी.टि.व्हि. कॅमेरा, गुप्त बातमीदार यांचेकडुन माहीती प्राप्त करण्यात येत होती. आरोपीतांच्या हालचाली वर निगराणी ठेवुन सापळा कार्यवाही आरोपी नामे 1) शुभम राजकुमार हरने, वय 23 वर्षे रा. शांतीनगर, कावळापेठ, रामसुमेरबाबा नगर, पोस्टे शांतीनगर नागपुर 2) विकास शंभुलाल शर्मा वय 23 वर्षे रा. बडकस चौक, कुंभारपुरा, रंगोली साडी मागे, पोस्टे कोतवाली नागपुर शहर यांना ताब्यात घेण्यात आले होते. नमुद गुन्हयातील आरोपीतांनी नागपुर शहरात पोलीस स्टेशन सिताबर्डी हद्दीत गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यावरुन आरोपीच्या ताब्यातुन 1 वाहण ॲक्टीव्हा गाडी क्र. एमएच/49/ए.जी/6950 व 4 मोबाईल असा एकुन 74,600/– रु चा मुददेमाल जप्त करण्यात आला.

तपासा दरम्यान पोलीस स्टेषन **सिताबर्डी** येथे दाखल असलेले **2 गुन्हे**, उघकिस आलेला असुन त्याव्यतीरिक्त 2 मोबाईल मिळुन आले आहे. आरोपीतांवर यापुर्वी सुध्दा नागपुर शहरातील विविध पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल आहेत.



<u>3) पो.स्टे. यशोधरानगर पोलीसांची कारवाई –</u>

आरोपी क्र. 1) वसीम खान वल्द याकुब खान, वय 31 वर्ष, रा. राजीव गांधी नगर झोपडपट्टी, अजारी मश्जिदजवळ, पो.स्टे. यशोधरानगर, नागपूर याने आपल्या लाल रंगाचा ॲटो क्र. एमएच/49/ए.आर/4059 मध्ये लाल रंगाचे घरगुती गॅस सिलेंडरमधील गॅस ही मोटार पंप मशीनला लागलेली नळीच्या माध्यमातून त्या ऑटोमध्ये धोकादायक रित्या भरत असल्याचा दिसल्याने तस ताब्यात घेवून त्याचे माध्यमातून आरोपी क्र. 2) शेख अशपाक वल्द मुक्तार, वय 36 वर्ष, रा. राजीव गांधी नगर झोपडपट्टी, रेल्वेपटरीजवळ, पो.स्टे. यशोधरानगर, याने अवैधरीत्या लाल रंगाचे एच.पी कंपनीच्या तसेच भारतगॅस कंपनीचा घरगुती गॅस सिलेंडरचा काळाबाजार करून अवैद्यरित्या ॲटोमध्ये विकण्याचा

उद्देशाने साठा करून ठेवल्याचे पंचासमक्ष मिळून आल्याने दोन्ही इसमाविरूध्द कलम 3,7 जिवानाश्यक वस्तु अधिनीयम सहकलम 285,336,34 भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद करून दोन्ही आरोपीतांना अटक करून सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. 5, श्री हर्ष पोद्दार, मा. सहा पोलीस आयुक्त, श्री परशुराम कार्यकर्ते, वपोनि पी.जे. रायण्णावर, पो.स्टे. यशोधरानगर, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि दिनेश लबडे, प्रशांत अन्नछत्रे, पोउपनि एस.ए. दराडे, भार्गव, सपोउपनि प्रकाश काळे, पोहवा विनोद वंजारी, मपोशि रोशनी दहीकर, यांनी केली आहे.

टिप – शासनाने प्राधिकृत केलेल्या गोगॅस पंपावर सदर 14 किलो गॅस ही 1,400 रूपयात भरावी लागते, तसेच अवैद्यरित्या विनापरवाना भरण्यात आलेली गॅस ही घरगुती सिलेंडर मधून 14 किलो गॅस ही 800 रूपयात भरण्यात येते.



**<u>4) पो.स्टे. यशोधरानगर हद्दीत राहणारा सराईत गुन्हगार नामे मोबीन अहमद वल्द समसुद्दीन अहमद वय 27 वर्षे हयास हद्दपार केल्याबाबत :</u>**

पोलीस स्टेशन यशोधरा नगर, नागपुर हद्दीत राहणारा सराईत गुन्हेगार नामे **मोबीन अहमद वल्द समसुद्दीन अहमद वय 27 वर्षे रा. टिपु सुलतान चौक, मेहबुबपूरा, नुरी मश्जीदच्या जवळ, पो.स्टे. यशोधरा नगर** हयाचे वर पो.स्टे. यशोधरा नगर येथे जबरीचोरी, परिसरातील व्यावसायीक व रहीवासी लोकांना दमदाटी व मारहान करणे, गैरकयदयाची मंडळी जमवुन अपखुशीने दुखापत करणे, गैरकायदयाची मंडळी जमवुन अश्लिल शिवीगाळ करून अपराधीक जिवे मारण्याची धमकी देणे. आपखुशीने घातक शस्त्राने दुखापत करणे जिवानीशी खुन करण्याचा प्रयत्न करणे, तसेच प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये असे 10 गुन्हे दाखल आहे.

वर नमुद इसम हा अपराध करण्याच्या सवयीचा असल्याने त्याचेविरूध्द मा. श्री. हर्ष पोद्दार, पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र. 05 यांचे आदेशाने मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. पी.एम. कार्यकर्ते, जरिपटका विभाग, नागपूर, व श्री. प्रदिप रायण्णावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन यशोधरा नगर, यांचे मार्गदर्शनाखाली नमुद इसमांचे हद्दपारी प्रस्ताव ना.पो.शि. उमेश टोंगे, यांनी तयार करून मा. पोलीस उपआयुक्त परि–5, यांना पाठविले असता त्यांनी सदर इसमांचे तडीपार प्रस्ताव त्यांचे कार्यालीन आदेश क्र. 11/2019 ता. 05/04/2019 ची कलम 56(1)(अ)(ब) मपोका 1951 अन्वये दोन वर्षाकरिता नागपूर पोलीस आयुक्तालायाचे हद्दीतुन हद्दपार करण्याचे आदेश दिल्याने नमुद इसमास सपोनि पी.डी. अन्नछत्रे, सहापोउपनि प्रकाश काळे पो.ना. विजय लांजेवार, पो.शि. आफताब शेख यांनी नमुद हद्दपार आरोपीस ता. 15/05/2019 रोजीला सदरचा हद्दपारीचा आदेश तामील करून त्याला पोलीस स्टेशन कन्हान हद्दीत सोडण्यात आले.

**<u>5) शहरातील नाईट राऊंड अधिकारी बाबत :–</u>**

नागपूर शहरात आज दि. 16.05.2019 रोजी मा. पोलीस उपायुक्त, (विशेष शाखा) श्रीमती निर्मलादेवी, हे नाईट राऊंड करणार आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर